


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | सोमवार १८ नोव्हेंबर २०२४ | अंक ३४४ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

# आता रडायचं नाही, लढायचं! अखेर पांढऱ्या सोन्याचा आणि सोयाबीनचा हमीभाव वाढला!





हाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय कृषी आणि वस्त्रोद्योग मंत्रालयाशी

केलेल्या सकारात्मक चर्चा आणि पाठपुराव्यानंतर, केंद्र सरकारने २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी सोयाबीन आणि कापसाचे हमीभाव जाहीर केले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. त्याचबरोबर राज्यात कापूस आणि सोयाबीनच्या हमीभावाने खरेदीसाठी आवश्यक अधिकाधिक केंद्रे वाढविण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्यासमवेत चर्चा झाली. यासंदर्भात केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी सकारात्मकता दर्शविली आहे. मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, कापूस हमीभावात यावर्षी ऐतिहासिक वाढ झाली आहे. मध्यम धागा कापसाला प्रति क्विंटल ७,१२१ रुपये हमीभाव निश्चित करण्यात आला आहे. तर लांब धागा कापसाला ७,५२१ रुपये प्रति क्विंटल निश्चित करण्यात आला आहे. हा हमीभाव गेल्या वर्षाच्या तुलनेत 501 रुपये प्रति क्विंटलने वाढला आहे.

## सोयाबीन हमीभावात देखील लक्षणीय वाढ

नवीन हमीभाव: रु. ४,८९२/- प्रति क्विंटल मागील वर्षीच्या तुलनेत (रु. ४,६००/-) लक्षणीय वाढ सोयाबीन उत्पादन आणि खरेदी व्यवस्थालागवडीखालील क्षेत्र: ५०.५१ लाख हेक्टर एकूण उत्पादन: ७३.२७ लाख मेट्रिक टन पीएसएस अंतर्गत केंद्राची मंजुरी: १३.०८ लाख मेट्रिक टन राज्य शासनाचे प्रथम टप्प्यातील उद्दिष्ट: १० लाख मेट्रिक टन २६ जिल्ह्यांत ५३२ मंजूर खरेदी केंद्रे ४९४ कार्यरत खरेदी केंद्रे १६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत २,०२,२२० शेतकरी नोंदणी एकूण खरेदी: १३,००० मेट्रिक टन

# मुंदडा परिवाराची पस्तीस वर्षांची साथ सोडून ज्ञानेश्वर चवरे शरद पवारांच्या राष्ट्रवादीत

केज ! प्रतिनिधी केज तालुक्यातील भांटुबा येथील रहिवासी तथा केज पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानेश्वर चवरे यांनी मुंदडा परीवाराची तब्बल पस्तीस वर्षांपासूनची साथ सोडत जुने सहकारी खा. बजरंग सोनवणे यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केला. ऐन निवडणुकीत मुंदडा परिवारासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे तर पृथ्वीराज साठे यांना बळ मिळणार आहे. केज पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानेश्वर अण्णासाहेब चवरे हे तालुक्यातील चांगले राजकीय व्यक्तित्व असून मोठा जनसंपर्क असलेले ते नेते आहेत. प्रत्येक गावात त्यांचा असलेला संपर्क ही त्यांची खूप मोठी जमेची बाजू आहे. ज्ञानेश्वर चवरे यांनी पंचायत समिती सभापतीच्या काळात अतिशय चांगले काम केले होते. पंचायत समिती सभापती म्हणून संपूर्ण तालुक्यातील प्रत्येक गावात त्यांनी आपला जनसंपर्क वाढवला होता.



मागील 35 वर्षाच्या काळात स्व. विमल मुंदडा यांच्यासोबत काम करताना प्रत्येक गावात आपल्या सोबत माणसे जोडलेली होती. मध्यंतरीच्या काळात नंदकिशोर मुंदडा यांच्यासोबत मतभेद झाले होते. त्यामुळे लोकसभा निवडणुकीपासून ज्ञानेश्वर चवरे हे नंदकिशोर मुंदडा यांच्यापासून दुरावले होते. सध्या विधानसभा निवडणुका चालू असताना त्यांचा प्रवेश मोठा राजकीय भूकंप मानला जात असून यामुळे नंदकिशोर मुंदडा यांना मोठा धक्का मानला जात आहे, तर पृथ्वीराज साठे यांचे बळ मोठ्या प्रमाणात वाढले आहे. ज्ञानेश्वर चवरे यांनी आपण घेत असलेला निर्णय थोडा त्रासदायक नक्कीच आहे, परंतु खा. बजरंग सोनवणे हे माझे जुने सहकारी आहेत. आज ते मोठ्या पदावर असल्यामुळे मला आनंद आहे. राजकीय विरोध असला तरी कधीही आमचे मतभेद झाले नाहीत आणि आम्ही एकत्रित काम करत असल्यामुळे आता नक्कीच आनंद होत आहे. यावेळी बोलताना खासदार बजरंग सोनवणे म्हणाले की, ज्ञानेश्वर चवरे हे माझे जुने सहकारी आहेत व माझ्या परिवारातीलच आहेत. ते नक्कीच माझ्या भावाप्रमाणेच राहतील. यावेळी कल्याण शिंनगरे यांची आठवण काढली व जसे ते होते तसे आता ज्ञानेश्वर चवरे राहतील. यावेळी ज्ञानेश्वर चवरे, विलास चवरे, सुनिल धपाटे, पप्पू धपाटे, नाना मोरे यांच्यासहा अनेक कार्यकर्त्यांचा प्रवेश झाला.

# अनिलदादा जगताप यांच्या कुटुंबियांडून संघर्षयोद्धा मा. मनोजदादा जरांगे पाटील यांचे जंगी स्वागत!



बीड, प्रतिनिधी- संघर्षयोद्धा सन्मानीय मनोजदादा जरांगे पाटील यांचे काल दि. 17 नोव्हेंबर रोजी बीडमध्ये आगमन होताच बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांचे कुटुंबिय तथा सहकाऱ्यांकडून मा. मनोजदादा जरांगे पाटील यांचे जंगी स्वागत करण्यात आले. सर्वप्रथम जगताप कुटुंबातील सर्व महिलांनी मिळून मनोजदादा यांचे औक्षण केले. त्यानंतर अनिलदादा जगताप यांचे बंधू किशोर जगताप, विजय जगताप आणि चिरंजीव आकाश जगताप यांनी मनोजदादा यांच्या गळ्यात पुष्पमाळ घालून हृदय सत्कार करत त्यांचे जंगी स्वागत केले व मनोजदादांच्या पाया पडून आशीर्वाद घेतले. यादरम्यान अनिलदादा यांचे सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्रपरिवाराने फटाक्यांची आतिषबाजी केली. सर्व समन्वयक मराठा सेवकांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या हर्षल्हासात संघर्षयोद्धाचा स्वागतविधी मोठ्या थाटामाटात संपन्न झाल्याने उपस्थितांमध्ये प्रचंड उत्साह संचारल्याचे दिसून येत होते. मा. जरांगे पटलांच्या आगमनी बीडकरांची देखील मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# अपक्ष उमेदवार रमेश आडसकर यांनी किल्ले धारुर विकास निर्धार मेळाव्यात भविष्यात विकासकामे मार्गी लावण्यासाठी दिले आश्वासन

माजलगाव मतदारसंघाचे नेते आमचे मार्गदर्शक आदरणीय रमेशरावजी आडसकर साहेब यांनी गेल्या पाच वर्षांपासून माजलगाव मतदारसंघातील किल्ले धारुर शहरात सर्व सामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहिलेले आहेत त्यामुळे किल्ले धारुर शहरातील व्यापारी बांधवांनी एकत्र येत “किल्ले धारुर विकास निर्धार मेळावा” याचे नियोजन करण्यात यावे असा अपक्ष उमेदवार रमेशरावजी आडसकर साहेब यांच्याकडे केला. किल्ले धारुर शहरातील सर्व व्यापारी, युवक नागरिक यांची बैठक नगरेश्वर मंदिर येथे करण्यात आले.

किल्ले धारुर विकास निर्धार मेळाव्यास सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष बाबुरावजी गुरुजी शिनगारे, अजयसिंहजी दिख्खत, जेष्ठ नागरिक बळी आण्णा कोमटवार, माजी उपनगराध्यक्ष आवेज भाई खुरेशी, माजी नगरसेवक हारुण सर, माजी नगरसेवक बाबु भाई शेख, सेवानिवृत्त शिक्षक महादेवरावजी शिनगारे गुरुजी, जेष्ठ व्यापारी कृष्णा आण्णा चिद्रवार, आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष आनंद भावठाणकर, डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.मयुर सावंत, मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष योगेश शेटे, सुवर्णकार संघटनेचे अध्यक्ष राजाभाऊ महामुनी, गोपाळ देवा, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष निलेशजी डुबे यांची प्रमुख उपस्थिती होती.

गेल्या अनेक वर्षापासून विधानसभा निवडणुकीत उमेदवार किल्ले धारुर शहरातील विकास कामे करण्यासाठी जाहीरनामे काढत होती. निवडणुकीतील जाहीरनाम्यानुसार एकही विकास कामे करण्यासाठी पुढाकार घेतला नाही त्यामुळे किल्ले धारुर शहरातील बाजारपेठ, शैक्षणिक क्षेत्र, आरोग्य सुविधा, नागरी सुविधांपासून वंचित राहावे लागले. गेल्या अनेक वर्षापासून निवडणुकीत मोठंमोठे आश्वासन दिले जातात. आता या निवडणुकीत आश्वासनाची वाट लागू नये यासाठी गेल्या पाच वर्षापासून मतदारसंघात सर्व सामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी व अडीअडचणीला साथ देण्यासाठी रमेशरावजी आडसकर साहेब यांच्या निवडणूक प्रचारार्थ किल्ले धारुर विकास निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

किल्ले धारुर शहरातील सामाजिक कार्यकर्ते विजय शिनगारे यांनी शहरातील समस्या किल्ले धारुर शहरालगत असलेल्या घाटाचे रुंदीकरण, कुंडलिका पाणी पुरवठा योजना, नगर परिषद अंतर्गत रस्त्याचे कामे, ऐतिहासिक महादुर्ग किल्ला संवर्धन, ऐतिहासिक महादुर्ग किल्ला, अंबाचंडी देवी यांचे पर्यटन विकास, क्रीडा संकुलाचे काम, मुला मुलींना जलतरण तलाव, ग्रामीण रुग्णालय व नागरी रुग्णालयात अत्याधुनिक मशिनरी उपलब्ध करुन रुग्णांची सोय, भुमिगत गटार योजना,



गल्लोगल्लीत खुली व्यायाम शाळा, औद्योगिक वसाहतीत उद्योग आणण्यासाठी विशेष प्रयत्न, ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे, शासकीय योजना केंद्र, गरजुवंत रुग्णांना आरोग्य योजना, शेतकऱ्यांच्या हिताची कामे, बस स्थानक अद्यावत करणे, किल्ले धारुर तालुक्यास आडस गावांसह इतर काही गावांचा समावेश, किल्ले धारुर शहरासह तालुक्यातील गावांना विज मुबलक प्रमाणात मिळावी यासाठी नवीन आरणवाडी येथे उपकेंद्र झाल्यास लाईट वापरता येईल १० MVA चा ट्रान्सफॉर्मर बसवणे अशी विकासकामे मार्गी लावण्यासाठी अपक्ष उमेदवार रमेशरावजी आडसकर साहेब यांनी आमदार झाल्यावर सोडवावे लागतील अशी विनंती केली. यावेळी किरण शेटे यांनी शेतकऱ्यांना मुबलक पाणी पुरवठा व्हावा यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत अशी मागणी केली. युवा नेते ऋषिकेश भैय्या आडसकर यांनी मतदारांना मतदान रुपी आशिर्वाद द्या आम्ही आपणास विकासासाठी कटिबद्ध राहून कामे करणार असे सांगितले.

किल्ले धारुर विकास निर्धार मेळाव्यास मार्गदर्शन करताना अपक्ष उमेदवार रमेशरावजी आडसकर यांनी विधानसभा निवडणुकीत मला काम करण्याची संधी द्यावी. किल्ले धारुर शहरातील गेल्या अनेक वर्षापासून विकासाच्या नावावर मते मागण्यात आली पण जाणीवपूर्वक विकास केला नाही. किल्ले धारुर शहरातील बाजारपेठ, रस्ता रुंदीकरण, किल्ला, दवाखाने अशी अन्य विकासकामे करायला सकारात्मक विचारांचा आमदार लागतो. किल्ले धारुर शहराची बाजारपेठ वाढीसाठी तालुक्यात गावांची संख्या वाढणे आवश्यक आहे त्यामुळे मला आमदार पदाची संधी मिळाल्यास पहिल्या टप्प्यात आडस गावासह इतर काही गावे किल्ले धारुर तालुक्यात समावेश करणार. आजच्या विकास निर्धार मेळाव्यात आपण सुचविल्या प्रमाणे मी नक्कीच किल्ले धारुर शहरातील अनेक समस्या सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असा विश्वास दिला.

किल्ले धारुर शहरातील विकास निर्धार मेळाव्यास विविध क्षेत्रातील युवक, व्यापारी, नागरिकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती..

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १८ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# मतदान हक्क व कर्तव्य

आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य होऊन 77 वर्षे झाली आहे. जगातील सगळ्यात मोठी लोकशाही आपल्या देशामध्ये आहे. स्वातंत्र पूर्व काळात इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी अनेक भारतीयांनी आपल्या प्राणाची आहुती दिली,अनेकांनी आपले रक्त सांडले तेव्हा हे स्वतंत्र आपल्याला मिळाले आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देश कसा चालवा यासाठी भारतीय राज्यघटना म्हणजेच संविधान लिहिण्यात आले. म्हणजेच लिखित राज्यघटना संपूर्ण जगामध्ये एवढी मोठी लिखित राज्यघटना कोणत्याही देशाकडे नाही. याचा अर्थ असा होतो संपूर्ण जगात भारत सर्वात मोठा लोकशाही असलेला एकमेव देश आहे. तर लोकशाही म्हणजे नेमकं काय लोकांनी लोकांसाठी निवडून दिलेले शासन म्हणजेच लोकशाही होय. लोकशाहीमध्ये सर्वात महत्वाचे म्हणजे शासन निवडून देणे याचाच अर्थ आपल्याला संविधानाने दिलेला मतदानाचा हक्क व अधिकार वापरणे. म्हणजे मतदान करणे, 18 वर्षावरील प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदान करण्याचा अधिकार आहे. परंतु प्रत्येक निवडणुकीला आपल्या देशामध्ये शंभर टक्के मतदान होत नाही. हे अत्यंत दुर्दैव म्हणावे लागेल. मतदानाच्या दिवशी मतदानाचे कर्तव्य प्रत्येकाने पार पाडावे याकरिता सरकार सार्वजनिक सुट्टी जाहीर करते. परंतु काही जण या सुट्टीच्या दिवशी फिरायला जाणे,पिकनिक करणे, घरी आराम करणे किंवा चित्रपट पहिल्या जाणे या प्रकारे साजरी करतात व आपला मतदानाचा हक्क बजावत नाही व नंतर लोकप्रतिनिधींना व सरकारला नाव ठेवत असतात. जे नागरीक मतदान करत नाही त्यांना सरकारला व लोक प्रतिनिधीना नाव ठेवण्याचा अधिकार नाही असे मला वाटते. मतदान करणे हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे. जो उमेदवार आपल्याला योग्य वाटतो त्याला मतदान करावे. कोणाला मतदान केले हे कुणालाही कधी सांगू नये. मतदान कोणास केले हे अतिशय गोपनीय ठेवावे. लोकशाहीमध्ये मतदानाला अन्य साधारण महत्त्व आहे हे प्रत्येक नागरिकाने समजून घेतले पाहिजे व आत्मसात केले पाहिजे. निवडणुक कुठलीही असो लोकसभा, विधानसभा, महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत यामध्ये योग्य उमेदवार निवडून देणे ही जबाबदारी संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेली आहे. ही जबाबदारी पार पाडणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे मतदान करणे हा आपला हक्क सुद्धा आहे. मतदानाचा अधिकार प्रत्येक नागरिकाला संविधानाने दिला आहे त्याचा वापर करणे म्हणजेच लोकशाही बळकट करणे होय. मतदारांचीसंख्याजेवढीवाढेलतेवढीचलोकशाहीबळकट होईल व राज्याला व देशाला ऊत्तम सरकार मिळेल. आपल्या घरातील प्रत्येक व्यक्तीने मतदान करावे व आपल्या आजूबाजूच्या लोकांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करावे. जेणेकरून सक्षम राष्ट्र घडवता येईल.

लेखक उल्हास सुधीर देशपांडे
छत्रपती संभाजीनगर

# प्रचारात घोषणांचा पाऊस

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच! तेव्हापासून सुरू झालेला आणि आज १५ व्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारापर्यंत पोहोचलेला महाराष्ट्राचा राजकीय प्रवास हा वेळोवेळी जनसामान्यांपर्यंत पोहोचणाऱ्या घोषणांचाही प्रवास आहे. संयुक्त महाराष्ट्राची आग्रही घोषणा अक्षरशः मनामनांत झिरपली, पण १९६२ च्या पहिल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतल्या घोषणा भिंतीवर रंगवल्या गेल्या असतील. पद्धतच होती तेव्हा तशी. ङ्गअमुकतमुक यांनाच मते द्याफ असे नुसते शाब्दिक आवाहन न करता निवडणूक निशाणीचे चित्रही गावोगावी, गल्लोगल्ली जमेल तसे काढले जायचे. काँग्रेसची त्या काळातली ङ्गबैलजोडीफ ही निशाणी कल्याणडोंबिवलीसारख्या तेव्हाही जनसंघाला निवडून आणणाऱ्या मतदारसंघांतल्या भिंतींवर अगदीच मरतुकडी, थकली-भागलेली दिसायची म्हणतात. कारण इतकेच की जनसंघाची निशाणी ङ्गपणतीफ ही रंगवायला सोपी. निवडणूक जाहीर झाली, उमेदवार ठरले की लगेच सरकारी इमारतींच्या लांबरुंद कुंपणभिंती हमखास सत्ताधारी पक्षाच्याच प्रचाराने रंगायच्या. सत्ताधाऱ्यांकडून ही अडवाअडवी सुरू होण्याआधीच कुणी उत्साही अपक्ष उमेदवार आणि त्याचे पाठीराखे ङ्गपाळणाफ, ङ्गटेलिफोनफ, ङ्गरॉकेटफ अशा अनवट निशाण्यांच्या चित्रांसह मोक्याच्या भिंती रातोरात रंगवून टाकायचे. अन्य पक्षही मग मिळेल ती भिंत शोधायचे. गावभरच्या भिंती सामान्य मतदाराला राजकारणाच्या वाटेवरून फिरवण्यासाठी सज्ज व्हायच्या. ही पद्धत देशाचे कडक मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांनी त्यांच्या कारकीर्दीत पूर्ण बंद करून टाकली. त्यामुळे शहर स्वच्छ दिसलेही असेल; पण राजकारणातल्या सभ्यपणाची एक खूण मात्र लोपली! कितीही प्रभावहीन पक्ष असो किंवा अपरिचित, अपक्ष उमेदवार असो, एकदा त्याच्या नावाने भिंत रंगली की मोठे पक्ष तिच्यावर अतिक्रमण करायचे नाहीत. हा राजकारणातला गावपातळीवर दिसणारा सभ्यपणाच होता. भिंतींवर प्रचारबंदी महाराष्ट्राने पाळली पण त्याऐवजी फ्लेक्सचे फलक दिसू लागले. त्या रंगीत फलकांवर साऱ्याच पुढाऱ्यांचे चेहरे गोरेपान, नीटनेटके दिसणे, ही तर ङ्गप्रतिमांफ्वर निवडणूक लढवण्याची फक्त सुरुवात. पुढल्या काळात प्रतिमेलाच इतके महत्त्व आले की प्रचारतज्ज्ञांना राजकीय पुढाऱ्यांची कंत्राटे मिळू लागली. नेत्याने कसे दिसायचे, कोणते कपडे घालायचे हेसुद्धा या कंत्राटी तज्ज्ञांकडून ठरवले जाऊ लागले. त्याचे गुलाबी उदाहरण आपण यंदा महाराष्ट्रात पाहतोच आहोत. त्याही आधी, म्हणजे कॅसेटचा जमाना होता तेव्हाही निराळ्या प्रकारे कंत्राटीकरण होतेच. गीतकार, गायक, वादक यांना कंत्राटे देऊन निवडणुकीआधी प्रचारगाण्यांची ङ्गकॅसेटफ तयार केली जाई. गाजलेल्या फिल्मी गाण्यांच्या चालीवर राजकीय गाणी बेतली जात. सुदेश भोसलेंसारख्या हरहुन्नरी आवाजांना अशा कॅसेटसाठी फार मागणी असायची. तोही जमाना संपला. आता एफएम रेडिओवर वेळ विकत घेऊन राजकीय जाहिराती केल्या जातात, त्यांत ऐकू येतील तेवढीच गाणी. प्रचाराचे व्हिडीओ मात्र झटपट फॉरवर्ड करण्याची सोय समाजमाध्यमांनी केलेली आहे. थोडक्यात, भिंती रंगल्या नाहीत तरी समाजमाध्यमांपर्यंतचे पर्याय खुले आहेत. त्यामुळेच अनेकांच्या फेसबुकाची ङ्गवॉलफ निवडणुकीआधीच्या वादावादीने रंगते आहे आणि या वादांमधूनही प्रचार होतोच आहे. पण वादाच्या मुद्द्यांभोवतीच प्रचार फिरवत ठेवायचा, ही निवडणुकीतली नवी युक्ती. त्यामुळे विरोधकांना नामोहरम केल्याचे समाधान तर मिळतेच, शिवाय महागाई, शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी असे रोजच्या जगण्याशी निगडित मुद्दे दूर ठेवता येतात. महाराष्ट्रात या धाटणीचा प्रचार यंदाही दिसतो आहेच. पण महाराष्ट्राप्रमाणेच ज्या झारखंडातही विधानसभा निवडणूक होते आहे तिथल्या प्रचाराचे कसून विश्लेषणच ङ्गलोकतंत्र बचाओ अभियानफ या संस्थेने नुकतेच केले. वादांभोवती फिरणारा प्रचार हा एव्हाना द्वेषमूलक झालेला आहे, असा निष्कर्ष ङ्गलोकतंत्र बचाओ अभियानफ्च्या निरीक्षणांतून काढता येतो. मुस्लिमांना शत्रू म्हणूनच दाखवणे, धर्माधर्मांत तेढ निर्माण करणे किंवा वाढवणे, आदिवासी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना राक्षसासारखी शिंगे दाखवणे आणि ङ्गघुसखोरफ कोण, कुठे याचा तपशील न देता कथित घुसखोरांवर अनेक प्रकारे दोषारोप करणे अशा चार प्रकारे झारखंडमध्ये प्रचार सुरू आहे, अशी या संस्थेची निरीक्षणे. त्यात नवीन काय असे महाराष्ट्रातील कुणाला वाटल्यास तो योगायोग नसून, महाराष्ट्रासारख्या राज्यातही विखार किती रुजला आहे याचे ते लक्षण मानावे लागेल. निवडणुकीतील स्पर्धक पक्षांनी एकमेकांची उणीदुणी काढणे, एकमेकांच्या नेत्यांवर विनोद करणे अथवा त्यांना हास्यास्पद ठरवण्याचा प्रयत्न करणे, हे सारे आधीपासून होतेच. महाराष्ट्रात हे काम शिवसेनेच्या प्रचारात उतरलेल्या दादा कोंडके यांनी सुरू केले आणि मग खुद्द शिवसेनाप्रमुखच ऐन भाषणांत दिल्लीकर नेतेमंडळींच्या नकला करू लागल

## सोशल मीडियावर मतपत्रिका व्हायरल केल्याप्रकरणी गुन्हा नोंद

आष्टी–प्रतिनिधी आष्टी विधानसभा मतदारसंघामधील टपाली मतपत्रिका क्रमांक १०११८६ सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे व तशा तक्रारी इतर उमेदवारांनी केल्या आहेत. ही टपाली मतपत्रिका १८५–मलबार हिल विधानसभा मतदारसंघ, मुंबई येथील निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अर्जानुसार (नमुना–१२) मुंबईच्या ताडदेव पोलिस ठाण्यातील पो.कॉ. गणेश अशोक शिंदे यांना निर्गमित करण्यात आली होती. विल्सन महाविद्यालय, नेताजी सुभाषचंद्र रोड,गिरगाव चौपाटी, चर्नी रोड, मुंबई येथील सुविधा केंद्रातील केंद्र क्रमांक ३ वरून त्यांनी टपाली मतपत्रिकेद्वारे मत नोंदविल्यानंतर त्यांच्या भ्रमणध्वनीमध्ये मतपत्रिकेचा फोटो काढून तो सोशल मिडियावर व्हायरल केला. त्यामुळे त्यांच्याविरूद्ध भारतीय न्याय संहिता कलम २२३ सह लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ चे कलम १२८ अन्वये बृहन्मुंबईतील गावदेवी पोलिस ठाण्यात शुक्रवार (ता.१५) रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदरील घटनास्थळ मलबार, मुंबई येथील असल्यामुळे गुन्हा तेथे नोंदविण्यात आला, असे आष्टीच्या निवडणूक निर्णय अधिकारी वसिमा शेख यांनी कळविले आहे.

# शेतक-यांनी रोहित्रासाठी २५ हजार वर्गणीतुन जमा केले पण लाईनमन नसल्याने परवानगी न दिल्याने पिके वाळणार ; संतप्त शेतकरी कार्यालयात जमा :- डॉ.गणेश ढवळे

**बीड प्रतिनिधी ,**

लिंबागणेश:- ( दि.१७ ) बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील घोलप वस्ती येथील शेतकऱ्यांनी रोहित्र जळाल्याने कोबी, कांदा,बटाटे,आद्रक,मेथी, ज्वारी,गहु आदी पिके वाळुन वाया जाणाऱ्या भितीने वर्गणी करून तब्बल २५ हजार रूपये दुपारी गोळा केली आणि पाटोदा येथुन खासगीत भरून आणण्यासाठी गोळा केले.मात्र दुपारपासून शेतकऱ्यांना लिंबागणेश उपकेंद्र येथील उपकेंद्र सहाय्यक यांना बदलण्याची परवानगी मागितली परंतु लाईनमन नसल्याने परवानगी देत येत नसल्याचे सांगितले त्यामुळे शेतकरी संतप्त झाले होते. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी शेतकऱ्यांसह महावितरण उपकेंद्र गाठत महावितरणचे वरीष्ठ वैष्णव यांच्याशी फोनवरून संवाद साधत नाराजी व्यक्त करत तातडीने परवानगी देण्याची मागणी करत नाराजी व्यक्त केली. यावेळी विक्की वाणी,शेतकरी संजय घोलप, सखाराम घोलप, अर्जुन घोलप,लहु घोलप, रमेश घोलप, दादा वाणी, अशोक घोलप,बबलु बागल, सुभाष वाणी आदी उपस्थित होते.

अभियंता पद २ महिन्यांपासून रिक्त ; लाईनमन गैरहजर असल्याने शेतकरी अडचणीत :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश उपकेंद्र येथील सहाय्यक अभियंता पदावरील देशपांडे यांची बढती झाल्यानंतर रिक्त असुन लाईनमन गैरहजर असणे आणि त्यांच्या अनागोंदी कारभारामुळे शेतकऱ्यांवर ही वेळ आली असुन रोहित्र बदलण्यासाठी तातडीने परवानगी देण्यात यावी आणि रिक्त सहायक अभियंता पद तातडीने भरण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १८ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# आता हा लोकसेवेचा वारसा डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडे सोपवत आहे-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी) दि.१७ : काकूंच्या मार्गदर्शनाखाली राजकारणात पाऊल ठेवले आणि आयुष्यभर लोकसेवेचा वसा अखंडपणे चालविला. कधीही काकूच्या नावाला गालबोट लागेल असे काम केले नाही. जनतेचे प्रेम आणि आशीर्वाद मिळवून लोकसेवा केली, असे सांगत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी ङ्गआता हा लोकसेवेचा वारसा डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडे सोपवत आहेफअसे जाहीर केले. सर्व जात-पात, धर्म, गट-तट, आपसातील मतभेद बाजूला ठेवून विधानसभा निवडणुकीत डॉ.योगेश क्षीरसागर यांना मोठ्या म ताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

बीड विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ नवगण राजुरी येथे रविवारी (दि.१७) आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी ह.भ.प.अमृत महाराज जोशी, ज्येष्ठ नेते रवींद्र क्षीरसागर, प्रा.जगदीश काळे, दिनकर कदम, नानासाहेब काकडे, माजी उपनगराध्यक्ष हेमंत क्षीरसागर, अशोक हिंगे, विलास बडगे, रामचंद्र बहिर, सखाराम मस्के, मंदाताई गायकवाड यांच्यासह राजुरी ग्रामस्थ, युवक, युवती जेष्ठ नागरिक व महिला यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पुढे बोलताना जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, सत्ता हे परिवर्तनाचे साधन आहे. आम्ही विना मोबदला घरपोच सेवा देणारी माणसं आहोत. आपला सालकरी कसा



असावा हे ठरवण्याची जबाबदारी मतदारांची आहे. येत्या २३ तारखेला विजयाचा गुलाल उधळण्यासाठी घड्याळाच्या चिन्हासमोरील बटण दाबून डॉ. योगेश क्षीरसागर यांना आपण प्रचंड बहुमताने निवडून द्यावे. प्रत्येकाने गावोगावी जाऊन मतदान करून घ्यावे. आपला गाव, परिसर व मित्रमंडळी यांना जागृत करून मतदान केंद्रापर्यंत आणावे, आहे त्या साधनासह गट, तट बाजूला ठेवून डॉ.योगेश क्षीरसागर यांना विजयी करावे असे आवाहन जयदत्त क्षीरसागर यांनी यावेळी केले. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, १५ वर्षांपूर्वीचे क्षीरसागर घराण्याचे वैभव पुन्हा राजुरीला प्राप्त करून देण्यासाठी, आणि काकूंचा वसा चालवण्यासाठी, मला तुमचे मतदान रुपी अ.शीर्वाद हवे आहेत. राजुरीकडे जायकवाडीच्या कालव्याचे पाणी आणण्याचे प्राथमिक प्राधान्य असेल आणि राजुरी सर्कलचा विकास पुन्हा सुरू करेन. माजी उपनगराध्यक्ष हेमंत क्षीरसागर यांनी देखील मनोगत व्यक्त करून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले. यावेळी दिलीप आहेर, मुकेश भोकरे, निलेश जगताप, गणेश जावळे, अशोक सोळुंके, विष्णू जाधव, शेषनारायण कोळेकर, पांडुरंग भोसकर, प्रा.सुदाम नवले, धनंजय जगताप, विश्वास आखाडे, सुरेश काशिद, राजाभाऊ सोळुंके, हनुमान जगताप, मारुती वाघ, बाबूराव जमदाडे, परमेश्वर सपकाळ, भाऊसाहेब जानवळे, जयराम गिते यांच्यासह परिसरातील कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप आहेर यांनी केले. सुत्रसंचालन नितीन गायकवाड यांनी केले. शेवटी ॲड.सदाशिव राहिंज यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## आमदाराने पैसे गोळा करण्यापलिकडे दुसरे कुठले काम केले नाही -रविंद्र क्षीरसागर

ज्येष्ठ नेते रविंद्र क्षीरसागर म्हणाले की, मागच्या वेळी मी राजुरी सर्कलमधील मतदारांना, माझ्या झोळीत माप टाका असे म्हणालो होतो. परंतु आता माझीच झोळी फाटली आहे. ज्याने मला घराबाहेर काढले, माझ्यावर अन्याय केला, जो व्यक्ती बापावर एवढा अन्याय करतो, तो जनतेवर किती अन्याय करत असेल याचा अनुभव तुम्ही घेतला आहे. या आमदाराने ५ वर्ष टक्केवारीच्या माध्यमातून पैसे गोळा करण्यापलिकडे दुसरे कुठले काम केलं नाही. फक्त आपली दुकानदारी सुरू ठेवली. त्यामुळे काकू आणि अण्णांचा लोकसेवेचा वसा योगेशमध्ये आहे, आता त्याला आपला पाठिंबा द्या, असे आवाहन त्यांनी केले.

# पुण्यात नरेंद्र मोदी यांच्यासोबत गुफ्तगू, अजित पवार यांनी भर सभेत आतली बातमी सांगितली

उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भोरमध्ये प्रचारसभा पार पडली. या सभेत अजित पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबतच्या भेटीत काय चर्चा झाली? याबाबतची माहिती जाहीर सभेत दिली. “विधानसभा निवडणुकीसाठी उद्या प्रचार संपणार असल्याने 6-6 सभा घ्यायला लागतायत. पुढं काही सभा करायच्या आहेत. मी भोर, राजगड, मुळशीतील नागरिकांना अनेकवेळा सांगितलंय. बदल करा. लोकसभेला मी आवाहन केलं. पण तुम्ही साथ दिली? माझ्या बारामतीनेच मला नाकारलं म्हणून मी तुम्हाला कुठल्या तोंडाने विचारणार? लोकसभेला विरोधी पक्षाने वाटेल तसा खोटा मुद्दा लावून धरला. मला भोर मतदारसंघात आल्यावर लाज



वाटते, विकास झालेला नाही. कायं इथले रस्ते, कायं इथलं बसस्थानक, राजगड करखाण्याची काय अवस्था आहे? तुम्हाला माझं साष्टांग दंडवत. कस कायं तुमची एवढी सहनशीलता?”, असं म्हणत अजित पवार यांनी काँग्रेस आमदार संग्राम थोपटे यांच्यावर टीका केली. “तुम्ही परत जाऊन त्यालाच बटन दाबून मतदान करताय. विकास नाही केला तरी तुम्ही त्यालाच मतदान करताय आणि त्याला पण बरं वाटतय. काँग्रेसचे सरकार असतानाही काही कामे करता आले नाहीत”, अशी टीका अजित पवारांनी केली. नरेंद्र मोदींना अजित पवारांना काय सांगितलं? “त्यांनी काही कामं केली नाहीत. पण आम्ही आमचं सरकार आल्यावर निधी दिलाय. लोकं आपली स्थलांतर करतायत, आपलं नेतृत्व काय? वा भोरकर. पहिल्या नंबरला शंकर मांडेकर यांचं नावं आहे. त्याला निवडून भोरचे सगळे प्रश्न मार्गी लावण्याचं कामं माझं. एमआयडीसी दूरच, इथले आलेले कारखाने गेले. आज महाराष्ट्रमध्ये सरकार आल्यावर आम्ही केंद्र सरकारकडून काही निधी आणू शकतो. लाडकी बहीण योजना आपण आणलेली आहे, ती आपल्याला चालू ठेवायची आहे. पुण्यातल्या सभेत माझं आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं बोलणं झालं. त्यांनी सांगितलं आपल्याला पुण्यात अजून विकासकामे करायची आहेत.

# यादी तयार आम्ही त्यांना बर्फाच्या लादीवर झोपवणार; राणेंच्या बालेकिल्ल्यात आदित्य ठाकरेंचा हल्लाबोल

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी आता अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे प्रचाराला जोर आला असून, एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. दरम्यान सिंधुदुर्गमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांची सभा पार पडली या सभेत बोलताना आदित्य ठाकरे यांनी महायुतीच्या नेत्यांवर घणाघात केला आहे. आता परिवर्तनाची वेळ आली आहे, ज्या चीपी विमानतळाचे उद्घाटन उद्धव साहेबांनी केलं होतं, ते विमानतळ या सरकारने बंद पाडलं. एक राजकीय यादी आम्ही बनवत आहोत. जे राजकीय गुंड आहेत, ज्यांनी लोकांना त्रास दिला आहे त्यांना आम्ही बर्फाच्या लादीवर झोपवणार आहोत, असं आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, जिथे जातो तिथे सांगत आहेत, की आपलं मविआच सरकार येणार आहे म्हणून, आंब्यासाठी जागतिक पातळीवर फूड प्रोसेसिंग करता येईल काय याबाबत आम्ही पाहात



आहोत. संदेशजी तुम्हाला २३ तारखेपासून आमदार म्हणून कामाला लागायचं आहे. या पुढच्या ४८ तासात तुम्हाला घाबरवलं जाईल, अडवलं जाईल, पळवून नेल जाईल. पण घाबरायचं नाही. सरकार आल्यानंतर ज्यांनी ज्यांनी नागरिकांना त्रास दिला आहे त्यांना सोडणार नाही, असा इशारा यावेळी आदित्य ठाकरे यांनी दिला आहे. ‘अदानींना मुंबई विकायला चालले आहेत. कदचित उद्या ते अदानींना इकडे घेऊन येतील. यांचे खरे मालक, खरे मुख्यमंत्री अदानी हे आहेत. मुंबई केंद्रशासित करण्याचा हे प्रयत्न करत आहेत. पण त्यांना माहितीये आम्ही रस्त्यावर उतरू, गेल्या दोन महिन्यात एक फसवी योजना आणली आहे. लाडकी बहीण योजना. २०२४ ला १५०० देतायेत त्यांची घोषणा होती १५ लाखांची. झाशीत एवढी दुर्घटना घडली तरी त्यांनी आपला एक ही कार्यक्रम रद्द केला नाही. महिला देशाच्या आधारस्तंभ आहेत, त्यांना बळकट करणारा कायदा आपण आणणारं आहोत. त्यांच्यासाठी पोलिस स्टेशन आम्ही आणणार आहोत. माझ्या वडिलांच्या कठीण काळात त्यांच्या पाठीत खंजीर खुपसला,’ असा हल्लाबोल त्यांनी यावेळी केला.

# त्यांची राजकीय कारकीर्द विश्वासघाताची; त्यांच्या सांगण्यावरून. धनंजय मुंडेंच शरद पवाराबाबत मोठं वक्तव्य

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी आता शेवटचे अवघे काही तास शिल्लक आहेत. वीस नोव्हेंबरला म्हणजे बुधवारी मतदान होणार आहे. तर तेवीस नोव्हेंबरला मतमोजणी आहे. दरम्यान प्रचाराला आता कमी वेळ राहिला आहे, प्रचार सभांना वेग आला असून, विरोधक आणि सत्ताधारी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करताना दिसून येत आहेत. या निवडणुकीकडे राज्यासोबतच संपूर्ण देशाचं लक्ष लागलं आहे. कारण दोन मोठ्या पक्षात पडलेल्या फ़ुटीनंतर महाराष्ट्रात पहिल्यांदाच निवडणूक होत असल्यानं आता मतदारराजा कोणाच्या पारड्यात आपलं मत टाकणार याबाबत उत्सुकता प्रचंड शिगेला पोहोचली आहे. दरम्यान पुन्हा एकदा मंत्री धनंजय मुंडे यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. शरद पवार यांचं नाव न घेता गद्दार या शब्दावरून धनंजय मुंडे



यांनी जोरदार निशाणा साधला. ते अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोलेमध्ये आयोजित प्रचार सभेत बोलत होते. तुतारीच्या आदर्श नेतृत्वाने शाहू कोण आणि गद्दार कोण हे आम्हाला सांगावे? 78 पासून त्यांची राजकीय कारकीर्द विश्वासघाताची आणि गद्दारीची राहिली आहे. पण त्यांनी केलं तर गद्दारी नाही, असा घणाघात मुंडे यांनी केला आहे. तुतारीच्या आदर्श नेतृत्वाने शाहू कोण आणि गद्दार कोण हे आम्हाला सांगावे? 78 पासून त्यांची राजकीय कारकीर्द विश्वासघाताची आणि गद्दारीची राहिली आहे. पण त्यांनी केलं तर गद्दारी नाही? पण त्यांच्याच सांगण्यावरून दादा आणि आम्ही केलं तर आम्ही गद्दार. अजितदादा आणि आम्ही कुणासोबत गद्दारी केली नाही. आमचं इमान मायबाप जनतेशी आहे. जनतेला विकासाचे जे स्वप्न दाखवले ते पूर्ण करण्यासाठी सत्तेत सहभागी झालो. 2019 ला भाजप – शिवसेनेला पूर्ण बहुमत मिळाले होते. पण काय खेळ झाला बघा. भाजपपासून कुणाला फोडलं? त्याला काय म्हणतात शाहू? त्याला गद्दारी म्हणत नाही ओ. गद्दार कोण? तर आमच्यासारखे छोटे कार्यकर्ते. ते मोठे, त्यांनी काहीही केले तर जमतं असा घणाघात धनंजय मुंडे यांनी शरद पवार यांच्यावर नाव न घेता केला आहे.

# मराठा बांधवांनो, मराठाद्वेशी क्षीरसागरांना धडा शिकवण्यासाठी एकजूट व्हा-सुनिल अनभुले

बीड, प्रतिनिधी- खूप झाला अन्याय. एकाच क्षीरसागर घराण्याने तुमच्या-आमच्या पिढ्यानूपिढ्यापासून मराठ्यांना त्रास दिलाय, बहुजनांना दुखावले आहे. समाजा समाजात तेढ निर्माण करून आपली राजकीय पोळी भाजली आहे. यात पीसला गेला आहे तो आपला मराठा समाज. आज खरच परिवर्तन करण्याची वेळ आली आहे. संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आंदोलनान तळागाळातील मराठा समाज एक झाला आहे. एक मराठा लाख मराठा, एक मराठा कोटी मराठा हे साऱ्या जगाने पाहिलं आहे. परंतु याचाच फायदा आपल्या मराठा समाजावर अन्याय करणारे बीडमध्ये घेत असतील तर अशांना खड्यासारखं बाजूला सारून मराठा समाजाने एकजुटीने परिवर्तन करण्याची वेळ आली आहे. बीड विधानसभा क्षेत्रात हे परिवर्तन शेतकऱ्याचं लेकरू, बीडचा भूमिपुत्र कलावंत, व्यापारी, उद्योजक, क्रिकेटप्रेमी एकंदरीत सर्वच क्षेत्र व सकल जाती-धर्मातील जनसमुदायातील लोकप्रिय असलेले मराठा सेवक अनिल माणिकराव जगताप हे नावच करेल. त्यासाठी आपल्या बहुजनांच्या अनिलदादाला मतदानरुपी आशीर्वादाची गरज आहे.

क्षीरसागर घरातील काका आणि बीडकरांना लुटणारे दोन्ही पुतणे त्यांनी आजपर्यंत मराठा समाजाला आणि बीडमधील बहुजन समाजामधील सर्वसामान्य माणसाला काय त्रास दिला आहे हे बीड नव्हे तर बीडची सारी जनता जाणून आहे. समाजा-समाजात भांडण लावायची आणि आपली राजकीय पोळी भाजून घ्यायची ही क्षीरसागर घराण्याची खेळी मराठा समाज आणि बहुजन समाज यावेळी यशस्वी होऊ देणार नाही. बीड शहरात मराठा समाजातील युवकांची पोलिसांकडून धरपकड चालू होती,पोलीस ज्याला दिसेल त्याला गाडीत टाकून घेऊन जायची पोलीस ठाण्यात न्यायची आणि खोट्या गुन्ह्यात अडकवायची अशावेळी सर्वात अगोदर मराठा समाजातील युवकांसाठी धावून आला तो म्हणजे आपल्या सर्वांचा हक्काचा दादा. अनिलदादा जगताप यांनी पोलिसांनाही ठणकावलं की, चुकीच्या गुण्यात निर्दोष मराठा युवकांना अडकवला तर याद राखा अशी अक्रमक भूमिका अनिलदादांनी राजकीय अस्तित्वाची कुठलीही परवा न करता मराठ्यांच्या लेकरांसाठी सर्वात अगोदर घेतली. तेंव्हा उमेदवार असणारे ढोंगी योगेश क्षीरसागर विधानसभा अध्यक्ष



पदाचा खोटानाटा राजीनामा दिला असल्याचे सोशल मीडियावर वायरल करून मराठा समाजाला भावनिक करून वेड्यात काढत होते तर दुसरीकडे विद्यमान आमदार यांनी विधानभवनात गुन्हे दाखल करा, चौकशी लावा अशी लक्षवेधी देखील केली होती व त्यानंतरच मराठा हजारो निर्दोष मराठा तरुणांना अटक करून चुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. मराठा समाजातील काही युवकांना चुकीच्या गुन्हात अडकवल्यानंतर त्यांच्या घरी महिना महिना चूल पेटली नाही. अशावेळी अनिलदादा जगताप या मराठा सेवकाने बीड शहरात आणि बीड शहरातील व खेड्यापाड्यातील गाव, वस्तीवर जाऊन मराठा कुटुंबांची भेट घेतली. आम्ही सर्व मराठा सेवक आपल्या सोबत आहोत काही होणार नाही असा धीर देत ग्वाही दिली. परंतु याचवेळी हे मराठा समाजातील युवकांना अडकवण्यासाठी याच बंगल्यातील दोन्ही पुतण्या आणि काकांनी काय काय कारस्थाने केली आहेत हे तुम्हा आम्हा मराठा समाजातील सुजाण नागरिकांना माहित आहे. हे क्षीरसागर घराण्यातील दोन्ही पुतणे मराठा समाजासाठी आम्ही किती काय करतो हे दाखवण्याचा डांगोरा पेटवतील तुम्हाला अमिष दाखवतील परंतु ही वेळ आहे परिवर्तन घडवण्याची मराठा समाजाला जिंकवण्याची. राज्यात काय निर्णय असेल याकडे आपल्याला पाहायचे नाही परंतु बीड चळवळीचे केंद्र आहे आणि या चळवळीच्या केंद्रातून मराठा समाजाच्या विचाराचा बहुजन समाजाच्या विचाराचा आपल्या हक्काचा माणूस आपल्याला विधानसभेत पाठवायचा आहे. त्यासाठी सर्वांनी आपले सर्व मतभेद आणि स्वार्थ बाजूला ठेवून मतांची विभागणी न होऊ देता येत्या 20 नोव्हेंबर रोजी अनुक्रमांक 13 शिलाई मशीन या निशाणीवर बटन दाबून बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिल जगताप यांना मतदानरुपी आशीर्वाद दया. असे अनिलदादांचे निष्ठावंत समर्थक आणि मराठा सेवक सुनिल अनभुले यांनी सकल मराठा समाज व सर्व जाती-धर्मातील मतदारांना अहवान केले आहे.

०००००

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १८ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# मी थोड्या दिवसाचा पाहुणा, किती दिवस.. मनोज जरांगे पाटील असं का म्हणाले?



राज्यात विधानसभा निवडणुकीचा रणसंग्राम सुरु झाला आहे. सध्या प्रचाराची रणधुमाळी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यात ठिकठिकाणी अनेक राजकीय सभा पार पडत आहेत. त्यातच आता मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी एक भावनिक आवाहन केलं आहे. माझं शरीर मला साथ देत नाही. मी कधी जाईल माहित नाही, मी तुमच्यात किती दिवस राहील, माहीत नाही, असे वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी केले. सध्या त्यांचा हा व्हिडीओ व्हायरल होत आहे. नोज जरांगे पाटील यांनी लासलगावमधील मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी "मी थोड्या दिवसाचा पाहुणा आहे. माझं शरीर मला साथ देत नाही. माझी तुम्हाला हात जोडून विनंती आहे, आरक्षण घेतल्याशिवाय गप्प बसायचं नाही. मी कधी जाईल माहित नाही, मी तुमच्यात किती दिवस राहील, माहीत नाही", असे विधान केले. "सर्वांनी सामूहिक आंदोलन करायचं"

"आता गावागावत उपोषण करायचं नाही. आता सर्वांनी एकत्र येऊन एका ठिकाणी उपोषण करायचे. मराठा एकदम विचित्र आहे, शांत आहेत तोपर्यंत शांत आहे, सरकार कोणाचंही येऊ द्या, त्यांचं डोकं बंद पडलं पाहिजे. आपण सर्वांनी सामूहिक आंदोलन करायचं", असे आवाहनही जरांगे पाटील यांनी केले.

### मनोज जरांगे काय म्हणाले?

"मला दर ८-१५ दिवसाला सलाईन लावली जात आहे. मला खूप वेदना होत आहेत. माझ्या शरीराची नुसती आग होत आहे. माझ्या शरीरातील हाडंही आता दुखायला लागली आहे. उपोषणामुळे माझे शरीर मला आता थोडीही साथ देत नाही. मी फक्त माझ्या माय-बाप समाजाची ताकद वाढावी, मराठ्यांची उंची वाढावी, त्यांची शान वाढवी, त्यांचे शक्ती आणि बळ वाढले पाहिजे, यासाठी धीर धरुन सर्व काही सुरु आहे. माझी तुमच्याकडून काहीही अपेक्षा नाही. माझी सर्वात मोठी संपत्ती तुम्ही आहात. माझा देव तुम्ही माझा बाप तुम्ही आहात", असे मनोज जरांगे म्हणाले.

# अनिलदादांना ख्रिश्चन धर्मगुरुंचे मिळाले आशीर्वाद



बीड, प्रतिनिधी- गेल्या चाळीस वर्षांपासून सकल जाती धर्मांतील जनसमुदायास सोबती घेऊन चालणारे बीड विधानसभेचे लोकप्रिय अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांना विधानसभा निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात सर्व जाती धर्माचा पाठिंबा आणि आशीर्वाद मिळत आहे. दि. 17 रोजी सकाळच्या सुमारास बीड शहरातील ख्रिश्चन धर्मियांच्या असेम्बली ऑफ गॉड चर्च या पवित्र स्थळी अनिलदादा जगताप यांनी भेट देऊन मुक्त संवाद साधला. याप्रसंगी अनिलदादांनी प्रभु येशू ख्रिस्तांना वंदन केले. धर्मगुरू यांनी अनिलदादांचा स्वागत सत्कार करून अनिलदादांना विजयासाठी शुभेच्छा आशीर्वाद दिले.

दरम्यान अनिलदादांनी उपस्थित ख्रिश्चन बांधव, भगिनींना बीडच्या सर्वांगीण विकासाकरिता येत्या 20 नोव्हेंबर रोजी अनुक्रमांक 13 बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिल माणिकराव जगताप या नावाच्या शिलाई मशीन या निशाणीवर बटण दाबून मला प्रचंड मतांना विजयी करा असे आवाहन केले. याप्रसंगी अनिलदादांसोबत सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

००००००

बीड-प्रतिनिधी भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय सहभाग असणाऱ्या लताताई राऊत त्यांचे गुरू श्री देवकीनंदन ठाकूर जी महाराज यांच्या शिकवण आणि आशीर्वादाने धर्म संस्कृती कार्यातही तितक्याच सक्रिय असतात. दरवर्षी त्या स्वामी श्री राजर-ाजेश्र्वर गिरी महार-ाजांसोबत नर्मदा परिक्रमा आणि पार्थिव शिवलिंग पूजन करण्यासही उप-स्थित असतात. लता-ताईचे धर्म प्रेम आणि संतांप्रती सेवाभाव पाहून राष्ट्रीय संत सुर-क्षा परिषदचे संस्थापक अध्यक्ष – स्वामी श्री राजराजेश्वर गिरीजी महाराज यांनी लता-ताई राऊत यांची राष्ट्रिय संत सुरक्षा परिषद महाराष्ट्र बीड च्या *संत सहयोगी महिला प्रकोष्ट सदस्य म्हणून निवड केली आहे. अमर कंठक येथे झालेल्या नर्मदा सेवा परिक्रमा कार्यक्रमावेळी त्यांना नियुक्ती पत्रक देण्यात आले . आणि लतातार्इंच्या हातून संत सेवा, सामज कंठक आणि विधर्मी जे भगवे कपडे घालून सनातनी हिंदू संतांना कलंकित करताहेत अशा विधर्मी पासून समाज, संत, वारकरी यांची निरंतर सुरक्षा व्हावी अशी इच्छा व्यक्त केली आहे



# स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे नाव परळीच्या इतिहासातून पुसून टाकण्याचा पालकमंत्र्यांचा प्रयत्न

## मतदारसंघात चालणारे अवैध धंदे, लुटमार, दादागिरी, गुंडगिरीला धनंजय मुंडेंचे पाठबळ

### पातळी सोडून बोलणे बंद करा अन्यथा आम्हालाही पातळी सोडता

### युवक नेते राजेभाऊ फड यांची पत्रकार परिषद सभेतून केलेल्या आरोपांना दिले

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) तुमच्याच घरात आमदारकी, तुमच्याच घरात खासदारकी, तुमच्याच घरात जिल्हा परिषद घेतात? मतदारसंघात दुसरे कोणी नाही का? पालकमंत्री काय ताम्रपत्र घेऊन आलेत का? मुंडे नावाच्या व्यतिरिक्त इतर कोणी कार्यकर्ते नाहीत का? डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला लोकशाहीमध्ये मागण्याचा अधिकार दिलेला आहे म्हणून आम्ही आमच्या पक्षाला उमेदवारी मागितली. पालकमंत्र्यांनी एका सभेत बोलत असताना विनाकारण आमच्यावर आरोप केले. राजकारण करत असताना कोणीही कोणाच्या कुटुंबावर बोलता कामा नये. मात्र पालकमंत्र्यांनी पातळी सोडून कौटुंबिक टीका केली. त्यांनी असले धंदे थांबवावेत. आमच्यावर पातळी सोडून टीका करणार असतील तर आम्हालाही तशी टीका करता येते असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी दिला. रविवार, दि.17 नोव्हेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक, परळी वैजनाथ येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधत असताना ते बोलत होते. पालकमंत्र्यांनी सभेत बोलतांना ज्या बॅनर फाडण्याच्या घटनेचा उल्लेख केला ती घटना त्यांनीच घडवून आणली असून बॅनर फाडणारा त्यांचाच कार्यकर्ता असल्याचे राजेभाऊ फड म्हणाले. पवार साहेबांचे बॅनर फाडणारा कार्यकर्ता धनंजय मुंडे यांचाच असल्याचे फोटो सदृश्य पुरावेही त्यांनी या पत्रकार परिषदेतून पत्रकारांना दिले. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे हे राजकारण करीत असताना पातळी सोडून आरोप करतात, लोकांना जाहीर सभेतून धमक्या देतात. त्यांना या कर्माची फळे भोगावी लागणार असून, येत्या 20 तारखेला होणाऱ्या मतदानातून परळी मतदार संघातील जनता धडा शिकवल्या शिवाय राहणार नाही. पालकमंत्र्यांनी स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे नाव पुसून टाकण्याची भिस्मप्रतिज्ञा केली होती. त्याप्रमाणे त्यांनी आज बीड जिल्ह्यातील भाजपचे कमळ हद्दपार करून टाकले





आहे. राजकारणातील उत्तुंग शिखरावरील मुंडे साहेबांचे नाव परळीच्या इतिहासातून पुसण्याचे काम ते आजपर्यंत करत आले आहेत. स्वतःला ते साहेबांचा स्वयंघोषित वारसदार समजतात मात्र तेच स्व.मुंडे साहेबांचे नाव पुसून टाकण्याचा घाट घालत असल्याचेही फड म्हणाले. पालकमंत्र्यांनी पिक विम्यात मोठा घोटाळा केला, जगमित्रा कारखान्यासाठी देवस्थानच्या जमिनी हडप केल्या, घोटाळ्यातील कमावलेला पैसा वापरून ते निवडणुकीत उतरले आहेत. पालकमंत्र्यांनी जनतेचा विकास न करता भ्रष्टाचाराच्या माध्यमातून शेकडो कोटींची माया जमवली. चालू असलेल्या विधानसभा निवडणुकीचे शपथपत्र दाखल करतांना पालकमंत्र्यांनी चुकीची आणि खोटी कौटुंबिक माहिती दिली आहे. पाच अपत्यांचा त्यांनी उल्लेख केला मात्र दुसऱ्या पत्नींचा उल्लेख त्यांनी केला नाही? याचा काय अर्थ समजायचा असाही सवाल त्यांनी उपस्थित केला. अवैध शस्त्रे बाळगणे, दादागिरी करणे, खून खराबे घडवून आणण्याचा धंदा पालकमंत्र्यांनी सुरू केलेला आहे. लुटमार चालवून मतदानाला पैसा वाटणे बोगस मतदान करून घेण्याचा गैरप्रकार करणाऱ्या पालकमंत्र्यांना घरी बसवल्याशिवाय या मतदारसंघाचं आणि बीड जिल्ह्याच भल होणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख हे एका गावात प्रचारासाठी गेले असता त्यांना प्रचारासाठी विरोध करण्यात आला. विरोध करणारे लोक हे पालकमंत्र्यांनी पाठवलेले गावगुंड होते. मुद्दामहून जातीयवादाचे विष पेरण्याचा पालकमंत्री प्रयत्न करत आहेत. मात्र त्यांचे हे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत. जनतेला त्यांच्या सर्व गोष्टी माहीत आहेत. येणाऱ्या मतदानातून ते दिसून येईल. पालकमंत्री टक्केवारीची गुत्तेदारी करतात परळी विधानसभा मतदारसंघात चालू असलेल्या विकास कामांमध्ये गुत्तेदार यांच्याकडून पालकमंत्री कमिशन घेतात. विकास कामांत टक्केवारीची पद्धत पालकमंत्र्यांनी पाडल्याने इथले विकास कामे बोगस होत आहेत. नगर पालिकेच्या अंतर्गत होणारे तसेच मतदारसंघातील पाणी पुरवठ्याच्या, रस्त्यांच्या कामात प्रचंड मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार पालकमंत्र्यांच्या आशीर्वादामुळे चालला असल्याचा घणाघात युवक नेते राजेभाऊ फड यांनी पत्रकार परिषदेतून केला.

स्व.पत्रकार दिलीप बद्दर यांना श्रद्धांजली ज्येष्ठ पत्रकार तथा मागील अनेक वर्षे पत्रकारिता क्षेत्राची निष्ठेने सेवा करणारे पत्रकार दिलीपजी बद्दर यांचे काही दिवसांपूर्वी दुखःद निधन झाले. पत्रकार परिषदेचा समारोप झाल्यानंतर उपस्थित सर्वांनी त्यांच्या पावन स्मृतींना श्रद्धांजली अर्पण केली.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादकः राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com